बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ४० | बुधवार, दि.०९ ते १५ सप्टेंबर २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

# ट्रक-पिकअपच्या भीषण धडकेत ६ कामगारांचा जागीच मृत्यू, ७ गंभीर

■ तेलंगणाला मजुरीसाठी निघालेल्या मध्य प्रदेशातील मजुरांवर नागराजवळ कोसळला भीषण आघात

■ मृतकांमध्ये ३ वर्षांच्या चिमुरड्याचा समावेश; सर्व जखमींवर गोंदियाच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू





**गोंदिया:–** गोंदिया–बालाघाट मार्गावरील नागरा परिसरात ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण अपघात घडला. गोंदियाकडून भरधाव येणाऱ्या ट्रकने कामगारांना घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनाला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की पिकअप वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत एका ३ वर्षांच्या चिमुरड्यासह ६ जणांचा मृत्यू झाला असून भुमेश्वर मात्रे (४७), संगीता मात्रे (३५), राजेंद्र पंचाले (३०), लक्ष्मी पंचाल (२७), संतोष वैद्दे (३५), राकेश बाहे (२४) आणि चालक संदीप बाहे हे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील किरणापूर परिसरातील रहिवासी असलेले मजूर पिकअप वाहनाने (चझ–१५ ढ ३४९५) तेलंगणातील जगतीहाल, करीम नगर येथे रोजगारासाठी निघाले होते. मात्र, नागरा गावाजवळ गोंदियाकडून येणाऱ्या भरधाव ट्रकने (चक–३५ अग–२५४७) त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली.

### अपघातातील मृतक

**या दुर्दैवी अपघातात आरुष मात्रे (वय ३ वर्षे, रा. सावरी), किरण संतोष वैद्दे (वय २६ वर्षे, रा. लोडाना), संतोष मात्रे (वय ३८ वर्षे), सुशिला मात्रे (वय ३५ वर्षे, दोन्ही रा. किन्ही), रुपसेन सत्यकर (वय ३५ वर्षे) आणि ज्योती सत्यकर (वय ३२ वर्षे) या ६ जणांचा जागीच मृत्यू झाला.**

### मजुरांना घेऊन जाणारा ठेकेदारही जखमी

**बालाघाट जिल्ह्यातील मजूर मोठ्या प्रमाणात तेलंगणात रोजगारासाठी जातात. लोडामा, पिंपळगाव, सावरी,पलेरा चार गावातील एकूण १२ जण संदीप बाहे या ठेकेदारासह तेलंगणाला जाण्यासाठी बोलेरोने सोमवारी रात्री निघाले होते. पण गोंदिगों या तालुक्यातील नागराजव बोलेरोला ट्रक धडक दिल्याने सहा जण ठार तर सात जण गंभीर जखमी झाले. यात ठेकेदार संदीप बाहे यांचा सुध्दा समावेश आहे.**

### अपघातात पत्नी आणि मुलाचा मृत्यू

**बालाघाट जिल्ह्यातील सावरी खूर्द येथील भुमेश्वर दुलीचंद मात्रे हे मिस्त्रीचे काम करतात. ते दरवर्षी रोजगारासाठी तेलंगणा येथे जातात. सोमवारी ते पत्नी सुशिला मात्रे व तीन वर्षांचा मुलगा आरुषसह आपल्या साथीदारांसह बोलेरोने तेलंगणा येथे जात होते. दरम्यान या बोलेरोला अपघात झाल्याने यात भुमेश्वरची पत्नी आणि मुलाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर भुमेश्वर हे गंभीर जखमी झाले**

**स्थानिकांची मदतीसाठी धाव, पोलिसांकडून तातडीने कारवाई**

अपघाताचा भीषण आवाज होताच परिसरातील नागरिकांनी आणि गोंदिया ग्रामीण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या जखमींना बाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे गोंदिया येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतदेहांचे शवविच्छेदन (पोस्ट मार्टम) जिल्हा रुग्णालयात सुरू असून पोलिसांचे परिस्थितीवर बारीक लक्ष आहे.याप्रकरणी गोंदिया ग्रामीण पोलिसांनी अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. एकाच परिसरातील ६ जणांचा अपघातात मृत्यू झाल्याने बालाघाट आणि गोंदिया परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त केली जात आहे.

# धानाला ३५०० रुपये भाव मिळायलाच पाहिजे–आ.रोहित पवार

● शेतकरी प्रश्नांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) आक्रमक;

● आमदार रोहित पवारांच्या नेतृत्वात तिरोडा व अर्जुनी मोरगावात धडक जनआक्रोश



**तिरोडा/अर्जुनी मोरगाव :**– धानाचा बोनस, सरसकट कर्जमाफी, २४ तास वीज आणि नियमित कर्जदारांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान यासह विविध ज्वलंत प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तिरोडा व अर्जुनी मोरगाव येथे भव्य “जनआक्रोश मोर्चा’ काढण्यात आला. जुनी नगर परिषद ते तहसील कार्यालयादरम्यान निघालेल्या या मोर्चाचे नेतृत्व युवा नेते आमदार रोहित पवार यांनी केले. यावेळी आयोजित सभेत रोहित पवार यांनी सत्ताधाऱ्यांच्या शेतकरीविरोधी धोरणांवर सडकून टीका करत सरकारवर जोरदार ताशेरे ओढले.

**“शेतकऱ्यांच्या कष्टाच्या धान पिकाला३५०० रुपये प्रती क्विंटल असा योग्य भाव आणि हक्काचा बोनस मिळालाच पाहिजे! नियमित कर्जदारांना ५० हजार रुपये प्रोत्साहन राशी, सरसकट कर्जमाफी, २४ तास वीज, आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्या व युवकांचा रोजगार या मुद्द्यांवर सरकार तातडीने निर्णय घेणार नसेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस रस्त्यावर उतरून अधिक तीव्र संघर्ष करेल.”**

**आमदार रोहित पवार, युवा नेते**



या जनआक्रोश मोर्चाला माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे, माजी आमदार चरण वाघमारे,माजी आमदार सुनील भुसारा, युवा नेते सलील देशमुख, पंकज नाना बोराडे, रविकांत वरपे, जिल्हाध्यक्ष रविकांत बोपचे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती यशवंत परशुरामकर, जिल्हा कार्याध्यक्ष मिथुन मेश्राम, उपाध्यक्ष सुरेश खोब्रागडे, प्रहारचे महेंद्र भांडारकर, मेघा बिसेन, कैलास पटले, वनिता ठाकरे, अतुल गण्यापवार, शुभांगी राखाडे, मंजु डोंगरवार, प्रियांका मेश्राम, देवानंद तागडे, आशिष घनश्याम कापगते, मनीष मुनेश्वर, राहुल भोईर, सोनू मेश्राम, अमोल राऊत, विनोद शहारे, आदेश राऊत, बाबुलाल नेवारे यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार रोहित पवार म्हणाले की, “महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अभूतपूर्व संकटात सापडला आहे. सरकारने धानाला जाहीर केलेला २३९० रुपये दर अत्यंत तोकडा आणि न परवडणारा आहे. त्यातही १०० टक्के धान खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांना ८० टक्के धान बाजारात पडक्या भावात विकावे लागले.” निवडणुकीपूर्वी एकरी २५ हजार रुपये बोनस देण्याचे आश्वासन देणाऱ्या सरकारने अधिवेशनात २० हजार रुपयांची घोषणा केली; मात्र सहा महिने उलटूनही एक रुपयाचा बोनस शेतकऱ्यांच्या पदरात पडलेला नाही, असा घणाघात त्यांनी केला.

छत्तीसगडच्या धान खरेदी मॉडेलवर टीका करताना ते म्हणाले, “सरकारने अभ्यास करण्यासाठी छत्तीसगडला शिष्टमंडळ पाठवले, पण पुढे काय झाले? तिथे प्रती क्विंटल ३५०० रुपये दर मिळतो, मग गोंदिया–भंडारा जिल्ह्यात भाजपचेच आमदार निवडून आले असताना शेतकऱ्यांना हक्काचा बोनस का मिळत नाही?” असे सांगत भाजप नेत्यांना लक्ष्य केले. महाविकास आघाडीच्या काळात आर्थिक टंचाई असतानाही शेतकऱ्यांना ३००० रुपयांचा दर व योग्य बोनस दिला होता, याचे स्मरणही त्यांनी करून दिले.

## धान उत्पादकांच्या प्रश्नांवर आमदार पवार यांच्याशी चर्चा; “अन्नदाता धान उत्पादक संघा’तर्फे विविध मागण्यांचे निवेदन



**अर्जुनी मोरगाव:–** अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राच्या दौऱ्यावर आलेले महाराष्ट्र विधानसभेचे आमदार रोहित पवार यांची ङ्गअन्नदाता धान उत्पादक संघफ (अर्जुनी मोरगाव) च्या वतीने भेट घेऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी धान उत्पादक शेतकऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न, धानाचा बोनस, आधारभूत दरात वाढ, नवीन वीज कनेक्शन आणि ई–पीक पाहणीतील अडचणींबाबत सविस्तर चर्चा करून विधानसभेत हे प्रश्न धसास लावण्याची आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

सध्या रासायनिक खते, किटकनाशके, डिझेलचे वाढलेले दर आणि शेतमजुरीमुळे शेतीचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. अशा स्थितीत शासनाने जाहीर केलेला २४४१ रुपये आधारभूत दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. त्यामुळे छत्तीसगडच्या धर्तीवर धानाला ३५०० रुपये आधारभूत दर देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली.या बैठकीदरम्यान माजी आमदार चरणभाऊ वाघमारे, गंगाधर परशुरामकर, यशवंत परशुरामकर, ललितकुमार बाळबुद्धे, शंकर लोगडे, घनश्याम भेंडारकर, डोये महाराज यांच्यासह अन्नदाता धान उत्पादक संघटनेचे पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पर्यवेक्षिकांची जिल्हास्तरीय कार्यशाळा



**गोंदिया:–** अंगणवाडीतील बालकांना गुणवत्तापूर्ण पूर्वप्राथमिक शिक्षण देण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत होणे गरजेचे आहे. बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रममुळे सेविकांना निश्चितच अधिक सक्षम होता येईल, असा विश्वास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजकुमार हिवारे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार डअठढकअट–२ मधील टास्क क्र. १९ अंतर्गत १२ वी व त्यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असलेल्या अंगणवाडी सेविकांसाठी बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या माध्यमातून विकसित करण्यात आला असून, सत्र २०२६–२७ मध्ये राज्यातील सर्व पात्र अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

याच अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी पर्यवेक्षिकांसाठी जिल्हास्तरीय एक दिवशीय उदबोधन प्रशिक्षण कार्यशाळा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य राजकुमार हिवारे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. नरेश वैद्य, गोंदिया उउझ्रज प्रियंका किरणापुरे, सालेकसा उउझ्रज श्रीमती बावणकर, विषय सहायक संदीप सोमवंशी व सुनील हरिनखेडे यांची उपस्थिती होती.

प्रशिक्षणामध्ये बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील १२ मॉड्यूल्सवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यासोबतच ब्लेंडेड मोड प्रशिक्षण म्हणजे काय, णपळश्रशरीप ॲपवर बीट स्तरावर प्रशिक्षण कसे घ्यावे, स्वाध्याय व प्रात्यक्षिके कशी पूर्ण करून घ्यावीत, मूल्यांकन प्रक्रिया कशी राबवावी आणि अंतिम परीक्षा कशा पद्धतीने होणार याबाबत पर्यवेक्षिकांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणासाठी पर्यवेक्षिका उषा आगाशे, अश्विनी कदम, विशेष शिक्षक सतीश गजभिये व साधनव्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे यांनी सुलभक म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन साधनव्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साधनव्यक्ती अनिता ठेंगडी व उर्मिला वैद्य यांनी विशेष सहकार्य केले.

## कूलरमध्ये पाणी भरताना शॉक लागून मामा-भाचीचा जागीच दुर्दैवी मृत्यू!



**तिरोडा:–** गोंदिया घरातील कूलरमध्ये पाणी भरताना अचानक विजेचा तीव्र प्रवाह उतरल्याने मामा आणि भाची या दोघांचा जागीच विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. ही खळबळजनक घटना आज, मंगळवार (०८ सप्टेंबर २०२६) रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास तिरोडा तालुक्यातील ग्राम गुमाधावडा येथे घडली. या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात आणि गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाग्यवान हरीचंद बावणे आणि त्यांची भाची सुप्रिया सुरेश सोनटक्के हे दोघे दुपारी घरातील विजेच्या कूलरमध्ये पाणी भरण्याचे काम करत होते. अचानक कूलरच्या लोखंडी बॉडीमध्ये हाय व्होल्टेज करंट उतरला. पाण्यामुळे विजेचा प्रवाह वेगाने पसरला आणि दोघांनाही विजेचा तीव्र झटका बसला. हा झटका इतका भीषण होता की, मदतीसाठी आरडाओरड करण्याची संधी मिळण्यापूर्वीच दोघांचाही घटनास्थळीच तडफडून दुर्दैवी अंत झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला आहे. ऐन सणासुदीच्या व कौटुंबिक वातावरणात मामा–भाचीचा असा अचानक दुर्दैवी अंत झाल्याने गुमाधावडा गावासह संपूर्ण तिरोडा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गोरेगाव तालुक्यात लोकशाही दिनाचे आयोजन २१ सप्टेंबरला

**गोंदिया :–** गोरेगाव तालुक्यात महिन्याच्या तिसऱ्या सोमवारला २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम तहसिलदार गोरेगाव यांचे अध्यक्षतेखाली, तहसिल कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेला आहे. लोकशाही दिनानिमित्ताने तहसिलदार यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे तालुका स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील. तरी गोरेगाव तालुक्यातील जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी असल्यास प्रपत्र–१ (अ) मध्ये विहीत केलेल्या अर्जामध्ये लेखी स्वरुपात सादर कराव्यात, असे आवाहन गोरेगाव तहसिलदार प्रज्ञा भोकरे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना कवडीमोल मोबदला, ‘रस्ता रोको’ करीत बळीराजा रस्त्यावर

## १२ गावातील शेतकरी संतप्त : गुदमा–प्रतापबाग नवीन रेल्वे लाइन, आंदोलन तीव्र करणार




**गोंदिया : –**गुदमा–प्रतापबाग नवीन रेल्वे लाइनसाठी गोंदिया तालुक्यातील १२ गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन केले जात आहे. मात्र शेतकऱ्यांना जमिनीचा कवडीमोल मोबदला दिला जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष व्याप्त आहे. रेल्वे प्रशासनाच्या अडेलतट्टू भूमिकेविरोधात शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करीत सोमवारी (दि.७) कटंगी नाका–बालाघाट रोडवर ‘रास्ता रोको’ आंदोलन केले. मकिसान जमीन बचाओ संघर्ष समितीच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

गोंदिया तालुक्यातील कटंगीकला, नागरा, हलबीटोला, सावरी, गर्रा, गोंदिया खुर्द, पोवारीटोला, दतोरा, खमारी, चुलोद यांसह १२ गावांतील शेतकऱ्यांची शेतजमीन, घरे, भूखंड आणि दुकाने रेल्वे प्रकल्पासाठी संपादित केली जात आहेत. या भागात जमिनीचा सध्याचा बाजारभाव एक ते तीन कोटी रुपये प्रतिएकर इतका आहे. असे असताना रेल्वे प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या हातात प्रतिहेक्टर १९ हजार ९३० रुपये मोबदल्याचे पत्र दिले जात आहे.

प्रशासनाच्या या अघोषित लुटमारीविरोधात २३ ऑगस्ट रोजी कटंगीकला येथे पार पडलेल्या बैठकीत सर्व जमीनधारकांनी हा नाममात्र मोबदला अमान्य करण्याचा एकमुखी निर्णय घेतला होता. बाधित शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले. तसेच पालकमंत्री इंद्रनील नाईक, खा. राजेंद्र जैन, आ. विनोद अग्रवाल व जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदनाद्वारे परिस्थितीची जाणीव करून दिली. मात्र, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून कोणताही सकारात्मक तोडगा निघाला नाही. त्यामुळे संतप्त १२ गावांमधील शेतकऱ्यांनी कटंगी नाका–बालाघाट रोडवर ‘रास्ता रोको’ आंदोलन करीत प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध केला.

या आंदोलनामुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये, याकरिता पोलिस प्रशासनाने बालाघाट टी पॉइटवरच वाहतूक अडवून इतर मार्गाने वळिवली, तर कटंगी नाक्याआधी वाहतूक अडवून नागरामार्गे रवाना करण्यात आली. अवजड वाहनेही आंदोलनामुळे मुख्य मार्गावरच थांबविण्यात आली होती. आंदोलनात संघर्ष समितीच्यावतीने अखिलेश सेठ, प्रा. अमित बुद्धे, राजेश नागरीकर, नंदू बिसेन, कार्तिक चव्हाण, मोहिनी वराडे, गोल्डी गावंडे, गोपाळ चुटे, श्याम बुद्धे. छोटू बुद्धे, सुप्रित बैस, रसिक पटेल, गुड्डू मिश्रा, पूजा सेठ, हंसराज लिल्हारे, नानू चिखलोंढे, विष्णू नागरीकर, सचिन रहागंडाले यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

### आंदोलकांनी काळ्या फिती लावून नोंदविला निषेध

**आंदोलनस्थळी आंदोलकांनी भजन गायन करीत काळे रुमाल आणि काळ्या फिती बांधून शांततापूर्ण मार्गाने आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही वेळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.**

### योग्य मोबदल्याशिवाय जमीन देणार नाही

**या भागात जमिनीचा सध्याचा बाजारभाव एक ते तीन कोटी रुपये प्रतिएकर इतका आहे. असे असताना रेल्वे प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या हातात प्रति एकर १९ हजार ९३० रुपये मोबदल्याचे पत्र दिले जात आहे. ही शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक असून जोपर्यंत शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही तोपर्यंत रेल्वे मार्गासाठी जमीन देणार नाही असा निर्धार शेतकऱ्यांनी यावेळी केला.**

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

**ज्यांची शेतजमीन, घर, भूखंड किंवा दुकान संपादित होत आहे, त्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे, जमीन आणि मालमत्तेचा मोबदला चालू बाजारभावाच्या पाचपट देण्यात यावा, अर्ध्या जमिनीच्या संपादनामुळे उर्वरित जमीन वापरा योग्य राहत नसल्यास संपूर्ण जमिनीचा मोबदला मिळावा, रेल्वे लाइनमुळे बंद होणाऱ्या पांदण रस्त्यांच्या जागी शेतकऱ्यांसाठी पर्यायी नवीन रस्ते तयार करून द्यावेत, आदी मागण्या करीत संघर्ष समितीने केल्या आहेत.**

## भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित करण्यासाठी उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात

**नागपूर :–** राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे कामकाजाच्या अनुषंगाने भेट देणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे.

## नवेगाव-नागझिराच्या जंगलात मशरूमचा “खजिना”!

### १०० हून अधिक प्रजातींची नोंद; बुरशी जैवविविधतेच्या अभ्यासाला मिळाली चालना



**गोंदिया:–**वाघ, बिबट्या, अस्वलांसह विविध वन्यजीवांसाठी प्रसिद्ध असलेल्या नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलात आता मशरूमचा देखील खजिना सापडला आहे. २२ व २३ ऑगस्ट रोजी झालेल्या दोन दिवसीय मशरूम व बुरशी जैवविविधता सर्वेक्षणातून जंगलातील या दुर्लक्षित जैवसंपदेचे समृद्ध वैविध्य समोर आले असून वन्यजीवांसह मशरूमच्या १०० हून अधिक प्रजाती आढळून आल्या आहेत.

मायकोलॉजी अर्थात बुरशी–शास्त्रातील सहा तज्ज्ञांसह वन विभागाचे अधिकारी व क्षेत्रीय कर्मचा?यांनी या सर्वेक्षणात सहभाग घेतला. व्याघ्र प्रकल्पातील विविध अधिवासांमध्ये फिरून माती, पालापाचोळा, मृत व कुजणारे लाकूड, पडलेली झाडे तसेच इतर वन परिसरात आढळणा?या मशरूमची पाहणी करण्यात आली. विविध प्रजातींचे निरीक्षण, छायाचित्रण आणि दस्तऐवजीकरण करण्यात आले. मशरूम म्हणजे केवळ पावसाळ्यात जंगलात दिसणारी बुरशी नव्हे, तर वन परिसंस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मृत पाने, लाकूड आणि इतर सेंद्रिय पदार्थांचे विघटन करून पोषकद्रव्ये पुन्हा मातीत मिसळण्याचे महत्त्वाचे कार्य बुरशी करते. त्यामुळे एखाद्या जंगलातील मशरूमची विविधता ही त्या परिसंस्थेच्या आरोग्याचा महत्त्वपूर्ण संकेत मानली जाते. दरम्यान, दोन दिवसीय सर्वेक्षणात आढळलेल्या १०० हून अधिक प्रजातींची सध्या प्राथमिक नोंद करण्यात आली असून या प्रजातींची तज्ज्ञांकडून शास्त्रीय ओळख व प्रमाणीकरण करण्यात येणार आहे. त्यानंतर या सर्वेक्षणाचा वैज्ञानिक अहवाल तयार केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या मंजूर प्रकल्पांतर्गत हे सर्वेक्षण करण्यात आले. नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील बुरशी जैवविविधतेचा शास्त्रीय अभ्यास झाल्याने भविष्यात वन व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. तसेच वन अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमध्ये मशरूम व बुरशीच्या विविधतेबाबत जागरूकता आणि अभ्यासाची दृष्टी निर्माण होण्यास मदत झाली.

## संपादकीय

### एमपीएससी परीक्षार्थ्यांचे आंदोलन आणि सरकारची नैतिकता

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो तरुण–तरुणींना पुन्हा एकदा अभ्यासाची पुस्तके बाजूला ठेवून रस्त्यावर उतरावे लागले आहे. पुण्यात आणि राज्यातील इतर महत्त्वाच्या शहरांमध्ये स्पर्धा परीक्षार्थ्यांनी पुकारलेले हे आंदोलन केवळ काही मागण्यांसाठी नसून, प्रशासकीय व्यवस्थेच्या निष्क्रियतेविरोधात पेटलेला हा आक्रोश आहे.

परीक्षांचे ढिसाळ नियोजन, ऐनवेळी बदलणारे नियम, पदभरतीतील विलंब, आणि वारंवार होणारे पेपरफुटीचे आरोप यामुळे लाखो तरुणांचे भविष्य टांगणीला लागले आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याऐवजी किंवा त्यांच्या मागण्यांवर तातडीने मार्ग काढण्याऐवजी प्रशासनाकडून दाखवली जाणारी अनास्था सरकारची नैतिकता आणि संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

महाराष्ट्र हा छत्रपती शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचा वारसा सांगणारा प्रांत आहे. ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील मुले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, कर्ज काढून, शहरांमधील अभ्यासिकेत १८–१८ तास घाम गाळतात. एक सरकारी अधिकारी बनून समाजाची सेवा करावी आणि कुटुंबाला सन्मानाचे दिवस दाखवावेत, हेच त्यांचे स्वप्न असते. मात्र, गेल्या काही वर्षांत एमपीएससीच्या कारभारात जी अस्थिरता आणि अपारदर्शकता आली आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांचा या व्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे. परीक्षांचे वेळापत्रक कोलमडणे, जाहिराती उशिरा येणे आणि पदसंख्या मर्यादित ठेवणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांची वयोमर्यादा निघून जात आहे.

ही विद्यार्थ्यांची चूक नसून संपूर्णतः प्रशासकीय ढिसाळपणाची शिक्षा त्यांना भोगावी लागत आहे. लोकशाहीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे हा नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांचा घटनात्मक अधिकार आहे. परंतु, जेव्हा विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्यांच्याशी संवेदनशीलतेने संवाद साधण्याऐवजी आंदोलनाला दडपण्याचा किंवा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला जातो, ही अत्यंत खेदाची बाब आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'युवा सक्षमीकरण' अशा मोठ्या घोषणा देणाऱ्या सरकारची नैतिकता ही केवळ व्यासपीठावरील भाषणांपुरतीच उरली आहे का? असा प्रश्न आजचा प्रत्येक परीक्षार्थी विचारत आहे. राज्याचे नेतृत्व करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, प्रशासकीय यंत्रणा ही लोककल्याणासाठी असते, ती विद्यार्थ्यांना मानसिक आणि आर्थिक गर्तेत लोटण्यासाठी नाही. एमपीएससीची स्वायत्तता जपणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच ती संस्था उत्तरदायी असणेही तितकेच गरजेचे आहे.

सरकारी पदभरतीतील सर्व त्रुटी तातडीने दूर करणे, परीक्षांचे वेळापत्रक तंतोतंत पाळणे आणि पारदर्शक प्रक्रियेची खात्री देणे ही काळाची गरज आहे. सरकारने केवळ पोकळ आश्वासने न देता, आंदोलक विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी थेट आणि सकारात्मक चर्चा करून सर्व प्रश्न वेळेच्या मर्यादेत सोडवले पाहिजेत. युवाशक्तीचा अंत पाहणे कोणत्याही लोकशाही सरकारला शोभणारे नाही. तरुण जर निराशेच्या गर्तेत लोटला गेला, तर देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची चाके थांबतील. म्हणूनच, एमपीएससीच्या परीक्षार्थ्यांचा हा आक्रोश दडपण्याऐवजी, सरकारने तात्काळ आपली राजकीय आणि नैतिक जबाबदारी ओळखून या तरुण पिढीला न्याय दिला पाहिजे!

## धान उत्पादक शेतकऱ्यांची उपेक्षा आणि राजकीय श्रेयवाद



महाराष्ट्रातील पूर्व विदर्भ, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रातील लाखो धान उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा हतबल झाले आहेत. निसर्गाचा लहरीपणा, अवकाळी पाऊस आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्याला सरकारने जाहीर केलेल्या बोनसच्या मदतीची तीव्र प्रतीक्षा आहे. परंतु, हंगाम उलटून गेल्यानंतरही बोनसची रक्कम खात्यात जमा न झाल्याने धान उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. याच मुद्द्यावरून आता विरोधकांनी रस्त्यावर उतरून आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. मात्र, या संपूर्ण संघर्षात मूळ प्रश्न बाजूला राहून सत्ताधारी आणि विरोधकांमधील राजकीय श्रेयवादच अधिक ठळकपणे समोर येत आहे, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

धानाची शेती हा आता फायद्याचा व्यवसाय उरलेला नाही. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीच्या दरात झालेली प्रचंड वाढ यामुळे धान उत्पादनाचा खर्च गगनाला भिडला आहे. शासनाने ठरवून दिलेला आधारभूत भाव (चडझ) हा प्रत्यक्ष उत्पादन खर्चाच्या तुलनेत फारच तोकडा ठरतो. म्हणूनच, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दरवर्षी प्रतिक्विंटल बोनस किंवा सानुग्रह अनुदान (एक्स–ग्रेशिया) दिले जाते. परंतु, दरवर्षी या बोनसच्या घोषणेपासून ते प्रत्यक्ष वितरणापर्यंत सरकारकडून चालढकल केली जाते. बोनस जाहीर होतो, मात्र तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईपर्यंत महिनोनब महिने वाट पाहावी लागते. बँक कर्जाचे हफ्ते, मुलांचे शिक्षण आणि पुढील हंगामाची तयारी कशी करायची, या चिंतेत शेतकरी होरपळत आहे.

दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या या उद्विग्नतेला हत्यार बनवून विरोधकांनी आंदोलनाचे रान उठवले आहे. लोकशाहीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे हे विरोधकांचे कर्तव्यच आहे, यात शंका नाही. मात्र, हे आंदोलन केवळ राजकीय फायद्यासाठी आणि निवडणुकीचे गणित साधण्यासाठी आहे की खरोखरच शेतकऱ्यांच्या हितासाठी, असा सवालही उपस्थित होत आहे. कारण जेव्हा जेव्हा सत्तांतर होते, तेव्हा केवळ चेहऱ्यांची अदलाबदल होते; धोरणांमधील अनास्था आणि प्रशासकीय दप्तरदिरंगाई मात्र तशीच राहते. आंदोलनाच्या माध्यमातून केवळ सरकारला घेरणे आणि कागदी इशारे देणे एवढ्यावरच विरोधकांनी थांबून चालणार नाही, तर या धोरणात्मक त्रुटींवर ठोस उपायांची मागणी करण्याची गरज आहे.

शासकीय यंत्रणेची ढिसाळता आणि निधी वितरणातील लालफितीचा कारभार यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मबळीराजाचा सातबारा कोरा करूफ आणि मशेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करूफ अशा मोठ्या घोषणा देणाऱ्या सरकारला प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी निधीची चणचण का भासते? असा सवाल आजचा धान उत्पादक विचारत आहे. केवळ घोषणा करून आणि पोकळ आश्वासने देऊन शेतकऱ्यांचे पोट भरत नाही, हे प्रशासनाने आणि सत्ताधाऱ्यांनी वेळीच ओळखले पाहिजे.

धान उत्पादक शेतकऱ्यांचा धीर आता सुटत चालला आहे. विरोधकांच्या आंदोलनाची वाट न पाहता आणि या मुद्द्याचे राजकारण होऊ न देता, सरकारने तातडीने प्रशासकीय चक्र फिरवून थकीत बोनसची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली पाहिजे. शेतकरी हा या देशाचा पोशिंदा आहे; त्याला मदतीसाठी रस्त्यावर उतरायला लावणे किंवा राजकीय आंदोलनांचे साधन बनवणे, हे पुरोगामी महाराष्ट्राला नक्कीच शोभणारे नाही!

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# एकलव्याचा अंगठा कापणाऱ्या शिक्षण व्यवस्थेमुळे उडाला विद्यार्थी आंदोलनाचा भडका!

दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर विद्यार्थी आंदोलन झाल्यानंतर विद्यार्थी जागृत होऊन देशभर मोठ्या प्रमाणात आपल्या हक्कासाठी लढण्यास सिद्ध होत आहे. या देशात ज्यांनी हजारो वर्षे स्त्रीशुद्रातिशुद्रांना शिक्षण नाकारले त्यांनी आज शिक्षण व्यवस्थेचे बाजारीकरण केले. धर्माज्ञेच्या विरुद्ध शिक्षण घेतले म्हणून एकलव्याचा अंगठा कापणारे, शंभुकाचा खून करणारे, या शिक्षण व्यवस्थेला भ्रष्ट करण्यास जराही कसर सोडत नाही. परिणामतः अनेक पिढ्या गलथान शिक्षण व्यवस्थेमुळे देशोधडीला लागत आहे. सद्यस्थितीतील पेपरफुटीची मालिका, परीक्षा रद्द प्रकरणे, मागास विद्यार्थ्यांची हेळसांड, वसतीगृहांमधील ढिसाळ व्यवस्था–गैरसोय, मागासवर्गीयांचा अनुशेष, नोकरभरतीतील दिरंगाई, यातील गैरव्यवहार म्हणजे नव्या एकलव्याचा अंगठा कापून मुख्य प्रवाहाबाहेर खदेडण्याचे काम आहे, असे जनमानस दृढ होत आहे. बेरोजगारीच्या संकटाची तीव्रता, तरुणांच्या भवितव्याबद्दल सरकारकडे कोणतेही ठोस उत्तर नाही, विद्यार्थी आंदोलने, शेतकरी आंदोलने आणि विविध लोकशाही संघर्षाचे संदर्भ या जनमानसात गुंफलेले आहेत. त्याविरुद्ध देशभर विद्यार्थी आंदोलन पेटले असून या आंदोलनाने अनेक बाबतीत भारतीय जनमानस प्रभावित केले. शैक्षणिक, प्रशासकीय, राजकीय, सामाजिक, न्यायिक बदलांच्या दिशेने पाऊल टाकलेले दिसते. त्यासोबतच नव पिढीतील नव्या नेतृत्वाच्या विकसनाचा महत्त्वपूर्ण पैलू पुढे येऊ लागला आहे. विद्यापीठ, महाविद्यालये, वसतिगृह, आश्रमशाळा इ.अनेक ठिकाणी असंख्य विद्यार्थी निर्भीडपणे पुढे येऊन सातत्याने न्यायासाठी आवाज उठवत आहेत. दिल्ली येथील जंतरमंतरच्या आंदोलनातील जेन झी रायझिंग आंदोलक विद्यार्थी नेत्या नेहा बोरा देशभर फिरून विद्यार्थी जागृती करण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. त्याचा एक भाग म्हणून नागपूर येथे "रेजिस्टन्स" 'सब याद रखा जाएगा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी नागपूरमधून उजव्या शक्तीचा पराभव झाला पाहिजे आणि नागपूर हे लोकशाहीवादी मूल्यांचा आधार बनले पाहिजे अशा प्रकारचे वक्तव्य केले. "देशात समानता सातत्याने धोक्यात येत आहे. देशातील शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात सामाजिक न्यायाची अंमलबजावणी अद्याप अपुरी असताना आरक्षण हटवण्याची मागणी केली जाते. पीएचडी प्रवेश प्रक्रियेत अनेकदा जागा रिक्त राहतात. काही विद्यार्थ्यांना एनएफएस घोषित करून प्रवेश नाकारला जातो. प्राध्यापक भरतीमध्ये एससी,एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील पदे रिक्त राहिल्याचे दिसते अशा परिस्थितीत सामाजिक न्यायाला सरकार बर्डन म्हणून पाहणे योग्य नाही." असा घणाघात बोरांनी केला. विद्यार्थ्यांसह सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते आणि सजग नागरिक वसंतराव देशपांडे सभागृहाच्या क्षमतेच्या दुप्पटीपेक्षाही अधिक तुडुंब गर्दीत कार्यक्रमाचा धमाका झाला. नेहा बोराचा यापूर्वी रांची, कोलकाता, जयपूर हैदराबाद, विजयवाडा, चेन्नई, मुंबई, पुणे, या ठिकाणी सुद्धा कार्यक्रम झाला. महाराष्ट्र आणि विशेषतः नागपूर येथे ओबीसी आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून सरकारची भूमिका स्पष्ट केली. आदिवासी विद्यार्थ्यांचा अनेक दिवसांपासूनचा संघर्ष चालू आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहांची दुरवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य आणि सुरक्षेच्या प्रश्नांवरून अनेकदा रणकंदन होऊनही ते प्रश्न सुटत नाही.

सामाजिक कल्याण विभागाच्या अंतर्गत आदिवासी आणि दलित यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याच्या संविधानिक तरतुदी असूनही त्याकडे दुर्लक्ष होत असताना एसटी आणि एससी या प्रवर्गातून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी काय करतात? आदिवासी आणि दलितांच्या समस्या सोडण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत काय पावलं उचलली जातात? त्यांना स्वायत्तता आहे की नाही अशा प्रकारचे कोडे तयार होत आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी विद्यमान यंत्रणा प्रयत्न करत नसतील तर आदिवासींमधून निवडून गेलेले, एसटी या प्रवर्गातून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी आमदार खासदार काय करतात? त्यांची काय जबाबदारी आहे? आमदार खासदारांना या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडून पाठवले जाते की विशिष्ट पक्षाची तळी उचलण्यासाठी निवडून दिले जातात का? असे खरे प्रश्न आता चव्हाट्यावर येऊ लागलेले आहेत.म्हणून विद्यार्थी सामाजिक आंदोलनाचा पर्याय स्वीकारतात. आंदोलक विद्यार्थी आणि नेहा बोरा यांच्यात विद्यार्थ्यांच्या समस्यांवर चर्चा झाली.

वसतिगृहातील सुविधा सुधाराव्यात, विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी थेट लाभ हस्तांतरण –डीबीटी– करण्याचा निर्णय रद्द करून योग्य मेस व्यवस्था करावी,एसटी प्रवर्गातील रक्त व अनुशेषातील पदे तातडीने भरावे, आरक्षणातील फेरबदल रद्द करावे असे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा निर्धार नेहा बोरा यांनी व्यक्त केला. त्यामुळे नेहा बोरानी उचललेले प्रश्न यापुढे महत्त्वाचे ठरतील का?

आदिवासींच्या समस्यासारखाच ओबीसी जातीनिहाय जनगणनेचा प्रश्न कळीचा मुद्दा बनलेला आहे. एकीकडे देशात जनगणनेचे सत्र सुरू झालेले असताना ओबीसीची जातवार जनगणना होत नाही म्हणून ओबीसी समाज अत्यंत अस्वस्थ आहे. महाजोतीची प्रभावी अंमलबजावणी, ओबीसी विद्यार्थी वसतीगृहांमधील गैरसोयी, विद्यार्थी शिष्यवृत्ती, विद्यापीठातील फी वाढ, जातवैधतेची प्रक्रिया, ओबीसी शेतकऱ्यांच्या सवलती, ओबीसी कर्मचाऱ्यांच्या अडचणी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी राखीव जागांचा तिढा, रद्द होणाऱ्या परीक्षा आणि पेपरलिकची झळ ओबीसींना सर्वाधिक पोहचते इ. ओबीसी समाजाचे हिताचे प्रश्न तडीस लागण्यासाठी ओबीसी जातीय जनगणना व्हावी अशी मागणी अनेक वर्षापासून धूळ खात पडलेली आहे. ओबीसी समाजाची लोकसंख्या बघता बावन्न टक्के ओबीसी समाज सर्व राजकीय पक्षांमध्ये ओबीसीचे किमान निम्मे लोकप्रतिनिधी आहेत, परंतु काही अपवाद वगळता, ते ओबीसीच्या प्रश्नावर कधीही स्पष्टपणे भूमिका घेताना दिसत नाही. ओबीसींच्या मतांवर, ओबीसी समाजातील लोकसंख्येने मोठ्या असलेल्या जातींची गठ्ठामतं घेऊन, हे लोकप्रतिनिधी निवडून जातात परंतु ओबीसींच्या कळीच्या मुद्द्यांवर मात्र बोलत नाही. ओबीसी समाजाचे प्रश्न, जनगणनेसारखे महत्त्वाचे प्रश्न, सुटल्या जात नाही त्यामुळे अशा या लोकप्रतिनिधीचं करायचं काय? यांना निवडून कशासाठी द्यायचं? अशा प्रकारचे संतापजनक प्रश्नांचा खल ओबीसी समाजात निर्माण झालेला आहे.

लोकांनी निवडून दिलेले आदिवासी वा ओबीसी लोकप्रतिनिधींची मतं त्याठिकाणी विधिमंडळात मांडले जात नसेल, ऐकले जात नसेल, तर मग ओबीसींनी आणि आदिवासींनी यांना निवडून कशासाठी द्यायचे? संविधानाने तरतुदी करून एससी एसटी प्रवर्गासाठी राखीव जागा निर्माण केल्या, कशाकरिता? लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी लोकांनी लढावे असा हा संकेत असावा आणि म्हणून विद्यार्थ्यांचे आंदोलनाकडे गांभीर्यपूर्वक बघण्याची गरज आहे. आदिवासींप्रमाणे ओबीसीचे आणि दलितांचे सुद्धा अतिशय महत्त्वाचे प्रश्न मोठ्या प्रमाणात धूळ खात पडलेले आहे.आणि जबाबदार यंत्रणा ढिम्म आणि इच्छा शक्ती हरवलेल्या अवस्थेत आहे. सगळ्या ठिकाणी परीक्षांमध्ये होणारा गोंधळ विद्यार्थ्यांच्या परिश्रमाकडे होणारी डोळेझाक आणि एकूणच विद्यार्थ्यांमध्ये वाढणारी बेरोजगारी यामुळे संपूर्ण देशभर अस्वस्थतेचे वातावरण विद्यार्थ्यांमध्ये दिसत आहे. आणि त्याचा परिपाक म्हणून विद्यार्थी नेते किंवा विद्यार्थी संघटना आता व्यवस्थेविरोधात आक्रमकपणे आंदोलीत होत आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ऐरणीवर येत असलेल्या समस्या खऱ्या अर्थाने समाजाच्या शैक्षणिक समस्या आहेत. या देशातील प्रस्थापित व्यवस्थेने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. शिक्षणामध्ये गैरव्यवस्था निर्माण केली त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्याची झळ मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना पोहचली. त्यामुळे या समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थी आंदोलन सुरू झालेले आहे. व्यवस्था बदलल्याशिवाय हे अशक्य वाटत असल्याने 'आजादी की दुसरी लडाई' हे आंदोलन सत्ता परिवर्तनाकडे कसे जाईल यादृष्टीने अनेक राजकीय पक्ष बघत आहेत.

पेपर फुटीची वगैरे प्रकरणं तात्कालिक भासत असली तरी शिक्षणासाठी संघर्ष ऐतिहासिक राहिलेला आहे. स्त्रिशुद्रातिशुद्रांच्या शिक्षणासाठी फुले दांपत्याच्या प्रयत्नाला इतिहासात तोड नाही. सावित्रीबाई फुले फातिमा शेख यांचे श्रेय अजरामर झाले आहे. मुलींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुल्यांनी शेणमातीचे गोळे हसतमुखाने अंगावर झेलले. सावित्रीबाई व जोतीराव फुल्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या, मराठा माळी समाजात शिक्षण पोहचण्यासाठी शाळा काढल्या. शिक्षण सर्वांना मिळण्यासाठी हंटर कमिशन पुढे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आग्रह धरला.

शैक्षणिक सुधारणा होत होत्या, पण पाहिजे तसा वेग घेतला नाही. स्त्रिशुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाचे विरोधक सनातन्यानी आपला विरोधाचा घाट बदललाच नाही. बराच काळ शेतकरी कामकरी यांच्या स्थितीत म. फुले यांच्या वेळच्या स्थिती पेक्षा फारसा फरक पडला नाही. सन १९३६ च्या रिपोर्टनुसार आपल्या देशात पुरुष ९.८% आणि स्त्रिया २.२% अशी साक्षरता समाजाचा आरसा दाखवते. यातील पूर्वीपासून शिक्षणात पुढे असलेले लोक सोडून दिले तर शेतकरी व मजूर लोकांतील शिकलेल्यांचे प्रमाण आणखी फारच कमी भरेल. स्वातंत्र्योत्तर काळात शिकलेल्या लोकांची संख्या लक्षणीय वाढलेली आहे. शिकलेली जेन झी पिढी तर काय करु शकते याचे प्रत्यंतर नेपाळ पाठोपाठ भारतात जंतरमंतरच्या आंदोलक भूमिनं अनुभवले आहे. स्त्रीशिक्षणाने बहुजन समाजाच्या शिक्षणाची सुरुवात करत असताना सावित्रीबाई फुले यांना जे भोगावं लागलं तेच आजच्या परिस्थितीत नेहा बोरा यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्यासाठी जेव्हा पाऊल टाकले तेव्हा त्यांच्यावर सुद्धा शाई फेक होऊन इतिहासाची पुनरावृत्ती झाली. हजारो वर्षे अनपढ ठेवून ज्यांच्या श्रमावर ऐश्वर्य भोगले ते शिक्षणाला घाबरले, स्त्रिशुद्रातिशुद्रांच्या शिक्षणातील भरारीने भयभीत झाले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते आत्म सन्मानाची भाषा शिकवते, मेंदूला विचाराची चालना देते, मनगटात क्रांतीकार्यासाठी स्फुरण देते, पावलं मुक्तीचा मार्ग शोधू लागते. ते दूधच मिळू नये यासाठी शिक्षण व्यवस्था नासवली जात आहे.

आर्थिक शोषणाच्या विरुद्ध लढाईच्या भितीपेक्षा सांस्कृतिक लढा कैकपटीने शोषकाला धडकी भरणारा वाटतो. त्यामुळे आर्थिक लढ्यातील अनेक मागण्या एकप्रकारे शोषक मान्य करतात परंतु सांस्कृतिक लढा आणि आत्म सन्मानाची लढाई जेव्हा उभी राहते तेव्हा शोषक मात्र चवताळून उभे होत असताना दिसतात. बळीराजा, लोकायत, जैन, बौध्द, लिंगायत, महानुभव, वारकरी, संत परंपरा आणि महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामास्वामी,नारायण गुरु ह्यांनी या व्यवस्थेला दिलेला सांस्कृतिक अस्मितेचा सामाजिक न्यायाचा लढा आजच्या पिढीला पथदर्शक ठरतो. हे ऐतिहासिक सत्य ध्यानात घेता शोषितांचा समतावादी प्रवाह ओबीसी, दलित आदिवासी,भटकेविमुक्त आणि नारी शक्तीच्या एकत्रित सहभागाने अधिक सघन होण्याची निकड अधोरेखित होते.

**अनुज हुलक?**
anujhulkey@gmail.com

## जागरुक नागरिकांनो मतदार यादीत आपले नाव तपासा!

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्याची प्रारुप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीमध्ये जिल्ह्यातील एकूण ११ लाख २३ हजार ८०५ मतदारांचा समावेश आहे. नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, वय तसेच इतर तपशील तपासून घ्यावा. नाव नसल्यास किंवा नोंदीमध्ये काही त्रुटी आढळल्यास संबंधित नागरिकांनी दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत दावे व हरकती सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मंदार पत्की यांनी केलेले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार याद्या अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, मयत, स्थलांतरित अथवा अपात्र मतदारांची नावे वगळणे तसेच मतदारांच्या नावातील, पत्त्यातील आणि अन्य तपशीलांतील त्रुटी दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या अनुषंगाने मतदारांनी मागील वर्ष २००२ च्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणामधील मतदार यादीत स्वतःचे तसेच संबंधित नातेवाईकांचे नाव व तपशील तपासावेत. यासाठी भारत निवडणूक आयोगाचे मतदार सेवा संकेतस्थळ htts: //voters.eci.gov.in यावर तपशील तपासता येणार आहे. मतदारांना घोषणापत्रामध्ये आवश्यक तपशील भरता येईल. याबाबत सहाय्यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याशी संपर्क साधावा.

गणना प्रपत्रामध्ये नमूद केलेला मागील विशेष संक्षिप्त पुनरिक्षणातील मतदार यादीतील तपशील उपलब्ध नसल्यास अथवा उपलब्ध तपशील आयोगाच्या डेटाबेसशी जुळत नसल्यास, संबंधित मतदारास मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोटीस निर्गमित करण्यात येईल. नोटीस प्राप्त झाल्यानंतर मतदारांनी आपल्या जन्म तारीख, जन्मस्थळ तसेच आवश्यकतेनुसार पालकांचा तपशील सिद्ध करण्यासाठी विहित कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.



**कोणती कागदपत्रे ग्राह्य?**

✽ केंद्र शासन, राज्य शासन किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमातील (PSU) नियमित कर्मचारी अथवा निवृत्तीवेतनधारकांना निर्गमित ओळखपत्र किंवा निवृत्तीवेतन प्रदान आदेश.

✽ शासन, स्थानिक प्राधिकरण, बँका, टपाल विभाग, एलआयसी (LIC) किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामाफ'त भारतात निर्गमित केलेले १ जुलै १९८७ पूर्वीचे ओळखपत्र, प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज.

✽ सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र.

✽ पारपत्र (पासपोर्ट).

✽ मान्यताप्राप्त मंडळ किंवा विद्यापीठाने निर्गमित केलेले मॅट्रिक्युलेशन अथवा शैक्षणिक प्रमाणपत्र.

✽ सक्षम राज्य प्राधिकरणाने निर्गमित केलेले कायमस्वरूपी रहिवासी प्रमाणपत्र.

✽ वनहक्क प्रमाणपत्र.

✽ सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले इतर मागासवर्गीय (OBC), अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) किंवा अन्य जात प्रमाणपत्र.

✽ राष्ट्रीय नागरिक नोंदवही (छठउ), ज्या ठिकाणी लागू असेल तेथे.

✽ शासकीय अधिकाऱ्यांनी कोणत्याही सांविधानिक किंवा प्रशासकीय नियमानुसार जतन केलेली कौटुंबिक नोंदवही.

✽ शासनामार्फत निर्गमित जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र.

✽ आधारबाबत भारत निवडणूक आयोगाच्या ९ सप्टेंबर २०२५ (परिशिष्ट–११) अन्वये निर्गमित निर्देश लागू राहतील.

वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे स्वतः, वडील आणि आई यांच्यासाठी स्वतंत्र स्व–प्रमाणित स्वरूपात, ज्या प्रकरणात आवश्यक आहेत त्या अनुषंगाने सादर करावीत.

**जन्मतारखेनुसार आवश्यक कागदपत्रे**

१ जुलै १९८७ पूर्वी भारतात जन्म झालेल्या व्यक्तींनी स्वतःची जन्मतारीख किंवा जन्मस्थळ सिद्ध करण्यासाठी नमुद यादीतील कोणतेही एक कागदपत्र सादर करावे.

१ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान भारतात जन्म झालेल्या व्यक्तींनी स्वतःची जन्मतारीख किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारे यादीतील कोणतेही एक कागदपत्र तसेच वडील किंवा आई यांची जन्मतारीख किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारे यादीतील कोणतेही एक कागदपत्र सादर करावे.

२ डिसेंबर २००४ नंतर भारतात जन्म झालेल्या व्यक्तींनी स्वतःची जन्मतारीख किंवा जन्म स्थळ सिद्ध करणारे कागदपत्र, तसेच वडील आणि आई यांची जन्मतारीख किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

पालकांपैकी कोणीही भारतीय नागरिक नसल्यास, मतदाराच्या जन्माच्या वेळी संबंधित व्यक्तीचा वैध पासपोर्ट व व्हिसाची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

**भारताबाहेर जन्म झाल्यास**

भारताबाहेर जन्म झालेल्या व्यक्तींनी विदेशस्थित भारतीय दूतावास किंवा मिशनने जारी केलेल्या जन्म नोंदणीच्या पुराव्याची प्रत सादर करावी. नोंदणीकरण किंवा नागरिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्व प्राप्त केले असल्यास नागरिकत्व नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक राहील.

**मतदारांनी नोंदींची पडताळणी करावी**

मतदार यादीतील नाव, जन्मतारीख, जन्मस्थळ तसेच संबंधित नातेवाईकांच्या नोंदींमध्ये अचूकता असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मतदारांनी संकेतस्थळावर उपलब्ध असलेली मागील मतदार यादीतील माहिती तपासून घ्यावी. माहितीमध्ये तफावत आढळल्यास किंवा संबंधित नोंद उपलब्ध नसल्यास घाबरून न जाता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे. मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोटीस प्राप्त झाल्यास त्यामध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत.

**पात्र नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पुढाकार घ्यावा**

लोकशाही प्रक्रियेत मतदनाचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदलेले असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. विशेषतः प्रथमच मतदान करणारे युवक, स्थलांतरित नागरिक तसेच मतदार यादीतील तपशीलामध्ये बदल झालेले नागरिक यांनी मतदार यादीची विशेष पडताळणी करावी.

३० सप्टेंबर २०२६ ही दावे व हरकती सादर करण्याची अंतिम मुदत आहे. त्यामुळे नागरिकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता प्रारुप मतदार यादीतील आपले नाव व तपशील तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मंदार पत्की यांनी केले आहे.

**–जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

## "माझ्या गुरुजनांचा आशीर्वाद माझ्यासाठी मोलाचा"-आमदार विजय रहांगडाले



**तिरोडा:–** तिरोडा–गोरेगाव विधानसभा मतदारसंघात आजवर जलसिंचनाच्या अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामे वेगाने प्रगतीपथावर आहेत. नुकतीच सुमारे ३०० कोटी रुपयांची जलसिंचन योजना मंजूर करून आणण्यात यश आले आहे. या सर्व विकासकार्यात आणि माझ्या वाटचालीत गुरुजनांचा आशीर्वाद व मार्गदर्शन अत्यंत मोलाचे आहे,ङ्क असे प्रतिपादन आमदार विजय रहांगडाले यांनी केले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून तिरोडा येथील ड्रीम गार्डन लॉन येथे सेवानिवृत्त शिक्षक, आदर्श शिक्षक तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रावीण्य मिळिवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ. परिणय फुके होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य राजेंद्र जैन, विधान परिषद सदस्य अविनाश ब्राह्मणकर, गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, माजी आमदार भजनदास वैद्य, खोमेश रहांगडाले, हेमंत पटले, भाजपा जिल्हाध्यक्ष सीता रहांगडाले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जितेंद्र रहांगडाले, तिरोडा नगराध्यक्ष अशोक असाटी, जिल्हा परिषद सभापती रजनी कुंभरे, पंचायत समिती सभापती तेजराम चव्हाण, जीडीसीसी बँकेचे संचालक डॉ. अविनाश जयस्वाल, जि.प. सदस्या तूमेश्वरी बघेले, माजी जि.प. उपाध्यक्ष मदन पटले, नगरपरिषदेचे उपाध्यक्ष राजेश गुनेरिया, सभापती देवेंद्र तिवारी, न.प. सदस्या ममता बैस व सदस्य संजयसिंह बैस आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

या सोहळ्यात सेवानिवृत्त शिक्षक, आदर्श शिक्षक, इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणरत्नांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शिक्षकांच्या अनमोल योगदानाचा गौरव करतानाच विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या यशाची टाळ्यांच्या गजरात दखल घेण्यात आली.

शिक्षकांच्या कार्याची दखल घेणे ही समाजाची नैतिक जबाबदारी असून विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपत उज्वल भविष्य घडवावे, असा सूर या वेळी मान्यवरांनी आपल्या भाषणांमधून व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मदन पटले यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विवेक ढोरे, नीरज सोनवणे, रजत धुर्वे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले.

# जयस्तंभ चौकातील जुन्या बसस्थानकाच्या आधुनिक नवनिर्माण व सौंदर्यीकरणाचे भूमिपूजन

## खासदार राजेंद्र जैन व आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते थाटात सोहळा




**गोंदिया:–** गोंदिया शहराचे मुख्य केंद्रस्थान असलेल्या जयस्तंभ चौक येथील जुन्या बसस्थानकाच्या विकास, सौंदर्यीकरण आणि आधुनिक नवनिर्माण कार्याचा भूमिपूजन सोहळा खासदार राजेंद्र जैन व आमदार विनोद अग्रवाल यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी ङ्गबेरार टाईम्सफ या वृत्तपत्राने सातत्याने आवाज उठवून पाठपुरावा केला होता, ज्यामुळे या कामाला गती मिळाली आहे.

या सोहळ्याला संबोधित करताना खासदार राजेंद्र जैन यांनी सांगितले की, ङ्गखासदार प्रफुल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून गोंदिया शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती दिली जात आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेसाठी समृद्धी महामार्ग, हवाई सेवा आणि रेल्वे कनेक्टिव्हिटीवर विशेष भर दिला जात आहे.ङ्ग पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, मुंबई–नागपूर–गोंदिया समृद्धी महामार्गाचे काम वेगाने सुरू आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमातून गोंदियासह बालाघाट, आमगाव, देवरी आणि कोहमारा क्षेत्राची रस्ते वाहतूक अधिक मजबूत होणार आहे. जयस्तंभ चौकातील जुन्या बसस्थानकाच्या या नव्या आधुनिक स्वरूपामुळे प्रवाशांना आणि शहरवासीयांना जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सुविधा मिळतील.

**“बेरार टाईम्स’च्या पाठपुराव्याला यश**

आमदार विनोद अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, जयस्तंभ चौक येथील जुन्या बस स्थानकाचे आधुनिक स्वरूपात नवनिर्माण आणि सुशोभीकरण झाल्याने प्रवासी तसेच शहरवासीयांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. हा प्रकल्प शहराचे बदलणारे रूप आणि नागरी सुविधांच्या विस्ताराच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

सुमारे १.७० कोटी रुपये खर्चातून उभारले जाणारे हे बस स्थानक आधुनिक सुविधांनी सज्ज असेल. याच्या बांधकामामुळे प्रवाशांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रतीक्षास्थान मिळण्यासोबतच जयस्तंभ चौकाचा कायापालट होऊन सुशोभीकरणाला नवी दिशा मिळेल. शहराच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या या महत्त्वाच्या ठिकाणी आधुनिक बस स्थानकाची निर्मिती होणे, हे गोंदियाच्या विकासातील एक नवा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

या भव्य भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी नगरपालिकेचे मुख्याधिकारी संदीप बोरकर, उपाध्यक्ष संतोष पटले, दिनेश दादरीवाल, रोहित अग्रवाल, न.प.बांधकाम सभापती प्रदीप माने, नगरसेवक कल्लू यादव, सतीश देशमुख, अभय अग्रवाल, निर्मला मिश्रा, विवेक मिश्रा, श्रीमती कुलकर्णी, नेहा यादव, सीखा सुनपुरे, कैलाश यादव, अजय यादव, अनुज जायसवाल, राज शुक्ला, केतन तुरकर यांच्यासह विविध समितीचे सभापती, नगरसेवक, नगरपरिषदेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# अनुसूचित जातीच्या पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी माजी मंत्री राजकुमार बडोले आक्रमक

- सामाजिक न्याय विभागाला दिले निवेदन
- कृती समितीच्या शिष्टमंडळासोबत सामाजिक न्याय मंत्र्यांची तातडीने बैठक आयोजित करण्याची मागणी
- पुणे येथील उपोषण मागे घेण्यासाठी शासनाने तात्काळ सकारात्मक तोडगा काढावा

**अर्जुनी–मोरगाव–:** अनुसूचित जातीच्या पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुणे येथील समाज कल्याण आयुक्त कार्यालयात सुरू असलेले धरणे आंदोलन व आमरण उपोषण तातडीने सोडविण्यात यावे, अशी खंबीर मागणी अर्जुनी–मोरगाव मतदारसंघाचे आमदार तथा माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांना निवेदन पाठवून विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या १९ ऑगस्ट २०२६ पासून पीएचडी संशोधक विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. तसेच २५ ऑगस्टपासून सुरेखा वासनिक व किरण देवकरे या विद्यार्थ्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. विद्यार्थ्यांच्या ढासळत्या प्रकृतीचा आणि शैक्षणिक भवितव्याचा विचार करून शासनाने याप्रकरणी तात्काळ मध्यस्थी करावी, असे बडोले यांनी निवेदनात नमूद केले.

**‘त्या’ विद्यार्थ्यांना जुन्या नियमानेच फेलोशिप द्या!**

सन २०२३, २०२४ व २०२५ मध्ये पीएचडी प्रवेशित झालेल्या सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मबार्टीफ्मार्फत सरसकट फेलोशिप देण्यात यावी, ही विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे. बार्टीने ३१ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीतील नवीन सर्वंकष धोरण यापूर्वीच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बॅचला लागू करू नये, अशी स्पष्ट भूमिका राजकुमार बडोले यांनी मांडली आहे.

संविधानाच्या कलम ४६ नुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे रक्षण करणे ही राज्याची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांचे उपोषण तातडीने सुटावे यासाठी कृती समितीच्या शिष्टमंडळासोबत सामाजिक न्याय मंत्र्यांची तातडीने बैठक घडवून आणावी आणि शासनाने संवेदनशीलतेने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी बडोले यांनी केली आहे.



**आमदार राजकुमार बडोले यांच्या प्रमुख मागण्या**

**सरसकट फेलोशिप:** सन २०२३ ते २०२५ या कालावधीत पीएचडी प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप मंजूर करावी.

**जाचक अटी व वयोमर्यादा रद्द:** फेलोशिपसाठी लावण्यात आलेली वयोमर्यादा, क्रिमीलेयरची अट आणि इतर जाचक अटी तातडीने हटवाव्यात.

**जागा वाढ व नवीन योजना:** पीएचडी फेलोशिपसाठी ४०० जागा मंजूर कराव्यात तसेच बार्टीमार्फत मपोस्टडॉक फेलोशिपफ योजना तात्काळ सुरू करावी.

**भत्ते मंजूर करा:** सर्व संशोधक विद्यार्थ्यांना घरभाडे (कठअ) व इतर वार्षिक भत्ते नियमानुसार लागू करावेत.

# क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार–खा.राजेंद्र जैन



**देवरी:–** :खासदार प्रफुल पटेल यांच्या सहकार्याने व पुढाकाराने देवरी शहरातील वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी उड्डाणपुलाचे काम मसिंगल पोलफ्वर व्हावे, यासाठी संबंधित विभागाकडे प्रभावी पाठपुरावा केला जाईल. शेतकरी हाच विकासाचा मुख्य केंद्रबिंदू असून, धान उत्पादक शेतकऱ्यांना योग्य बोनस मिळावा यासाठी शासनस्तरावर सतत पाठपुरावा केला जाईल,ङ्ग अशी ग्वाही खासदार राजेंद्र जैन यांनी दिली.

येथील आमगाव रोडवरील अग्रसेन भवन येथे देवरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने खासदार राजेंद्र जैन यांच्या सत्कार सोहळ्याचे व भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांच्या वतीने खासदार जैन यांचे उत्स्फूर्त व जंगी स्वागत करून शाल व श्रीफळ देऊन त्यांचा भावूक सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात पुढे बोलताना खा. जैन म्हणाले की, देवरी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी मी कटिबद्ध आहे. महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.

या भव्य मेळाव्याला सर्वश्री नरेश माहेश्वरी, प्रेमकुमार रहांगडाले, सुरेश हर्षे, केतन तुरकर, रमेशभाऊ ताराम, गोपाल तिवारी, सी. के. बिसेन, पार्वताबाई चांदेवार, अर्चना ताराम, सुमन बिसेन, उषा तिवारी, प्रल्हाद भोयर, पंकज सहारे, भैयालाल चांदेवार, नेहमीचंद आंबीलकर, हिना टेंभरे, शर्मिलाताई टेंभुर्णे, सचिन अग्रवाल, भैयालाल पुस्तोडे, सुमित अग्रवाल, श्रेय जैन, मुकेश अग्रवाल, कैलास अग्रवाल, दिलीप दृगकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोरणात्मक निर्णयामुळे सभासदांचे कोट्यवधी रुपये वाचले

## जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा



**आमगाव:–** निवडणुकीच्या वेळी सभासदांना दिलेल्या वचनानुसार संस्थेचा कारभार पूर्णपणे पारदर्शक, गतिमान आणि काटकसरीचा करण्यात आला आहे. केवळ नफा कमविणे हा संस्थेचा उद्देश नसून सभासदांचे कल्याण हाच मुख्य हेतू आहे. गेल्या साडेतीन वर्षांत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांमुळे सभासदांचे कोट्यवधी रुपये वाचले असून संस्था आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम झाली आहे, असा विश्वास जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी गोंदिया जिल्हा पतसंस्थेचे सचिव कमलेश बिसेन यांनी व्यक्त केला.

सालेकसा रोड येथील शुभमंगल हॉल व लॉन येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा)पार पडली. या सभेत संस्थेच्या साडेतीन वर्षांतील प्रगतीचा लेखाजोखा आणि ताळेबंद सादर करण्यात आला. सभेत निवडणुकीनंतर दिलेल्या आश्वासनानुसार सभासद कर्ज व्याजदर थेट ८.७५ टक्के एवढा कमी करण्यात आला. यामुळे साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात ५१.३७ कोटी रुपयांच्या कर्जवाटपावर व्याजापोटी सभासदांचे ३.६४ कोटी रुपये वाचले. एका सभासदाला पूर्ण कर्ज कालावधीमध्ये एकूण ४ लाख ४६ हजार २३४ रुपये व्याजापोटी कमी भरावे लागले आहेत.

या सभेला संस्थेच्या अध्यक्षा दिपिका यादव, उपाध्यक्ष चंद्रशेखरएस. चौधरी, सचिव कमलेश बिसेन, शाखाप्रमुख सचिन कुथे तसेच संचालक मंडळाचे सर्व सदस्य, महिला संचालक व तज्ञ संचालक उपस्थित होते. सभेनंतर सर्व सभासदांसाठी मस्वरुची भोजनाफ्चे आयोजन करण्यात आले होते.

# बोरगावात साथरोगाचा प्रादुर्भाव; २ ३ बाधित



**गोरेगाव :–** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडा अंतर्गत बोरगाव गावात दूषित पाण्यामुळे अतिसारचे २३ रुग्ण आढळले. त्यापैकी २२ रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडा येथील बाह्यरुग्ण ओपीडी येथे औषधोपचार देण्यात आला तर एका रुग्ण भरती असुन त्याची प्रकृती ठिक आहे. गावातील साथ आटोक्यात व परिस्थिती नियंत्रणात आहे.

तालुक्यांतर्गत येणाऱ्या बोरगाव येथे साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढल्याची गंभीर दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, गट विकास अधिकारी धोटे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरजंन अग्रवाल व गोरेगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी संपूर्ण वैद्यकीय व प्रशासकीय फौजफाट्यासह बोरगावला तातडीने भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. डॉ गोल्हार यांनी संबधिताकडुन पाणी शुद्धीकरण बाबत माहिती घेतली. पुढील सात दिवस त्याठिकाणी आरोग्य शिबीर लावणे, साथरोग भागात मेडिक्लोर व आवश्यक औषधी वाटप करणे तसेच गावात नळ योजना असून त्याची दररोज शुद्धीकरण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्यात.

आशा स्वंय सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी सर्व्हेक्षण सुरू करण्यात आले आहे. साथरोग पूर्णपणे नियंत्रणात येईपर्यंत आरोग्य पथक बोरगावात तळ ठोकून राहणार आहे. खंड विकास अधिकारी धोटे आणि आरोग्य विस्तार अधिकारी पटले यांनी गावातील स्वच्छतेची पाहणी करून ग्राम अधिकाऱ्यांना तातडीने नाल्या उपसण्याचे व स्वच्छता मोहीम राबवण्याचे कडक निर्देश दिले. पाण्याच्या स्त्रोतांमध्ये टीसीएल पावडर टाकून शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# बहेकार सभापती तर तुरकर उपसभापती



**गोंदिया :–** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती व उपसभापतीपदासाठी सोमवारी (दि. ७) घेण्यात आलेल्या निवडणुकीत सभापतीपदी चेतन बहेकार यांची अविरोध निवड करण्यात आली. मात्र, उपसभापतीपदासाठी दोन अर्ज आल्याने निवडणूक घेण्यात आली व त्यात धनंजय तुरकर निवडून आले.

बाजार समिती सभापती भाऊराव उके व उपसभापती राजकुमार पटले यांच्या मनमर्जी कारभाराला कंटाळून संचालक एकत्र आले व त्यांनी दोघांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव सादर

केला होता. त्यानुसार, १८ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत अविश्वास प्रस्ताव पारीत झाल्याने उके व पटले यांना पायउतार व्हावे लागले. त्यानंतर नियमानुसार सभापती व उपसभापतींची निवडणूक सोमवारी (दि. ७) घेण्यात आली. अर्जुनी–मोरगाव येथील सहायक निबंधक आर. एन. बोरकर यांची या निवडणुकीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती व त्यांच्या देखरेखीतच निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पार पडली.

बाजार समितीच्या सभागृहात घेण्यात आलेल्या निवडणुकीत सभापतीपदासाठी फक्त चेतन बहेकार यांचा अर्ज होता व त्यांच्या विरोधात अर्ज नसल्याने बहेकार यांची सभापतीपदी अविरोध निवड करण्यात आली. तर उपसभापतीपदासाठी धनंजय तुरकर आणि पंकज यादव या दोघांचे अर्ज होते व त्यामुळे बॅलेटवर निवडणूक घ्यावी लागली. मात्र यामध्ये तुरकर यांना १३ तर यादव यांना दोनच मते पडली. परिणामी उपसभापतीपदी तुरकर निवडून आले.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांचा सत्कार



**तिरोडा:–** दरवर्षी प्रमाणे यंदाही स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितित नविन आलेले धानाच्या मालाची आवक सुरु झाली आहे. या अनुषंगाने भजेपार येथील धर्मलाल नत्थू बोपचे यांच्या द्वारे पहिल्यांदा आपले धान स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणले होते.

भजेपार येथील धर्मलाल बोपचे यांनी आपले नविन सतरा अकरा नावाचे धान तिरोडा कृषी उत्पन्न बाजारात विक्रीच्या उद्देशाने आणले होते. यावेळी कृ. उ. बा. स.चे सभापती जितेंद्र रहांगडाले यांच्या हस्ते बोपचे यांना शाला, श्रीफळ व शेतमाल फवारणी पंप भेट देवुन सत्कार करण्यात आला. त्याच श्रृंखलेत आडत व्यापारी तेजराम टेंभरे यांच्याद्वारे त्या धानाला विक्रीसाठी उपसभापती भूमेश्वर रहांगडाले यांच्याद्वारे व अ वर्ग व्यापारी रोहण ट्रेडर्स च्या वतीने दिलीपकुमार असाटी द्वारे उत्तम दराने खरेदी केल्याने त्यांचे संचालक भूषण झरारीया यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

मार्केट यार्डात कृषी मालाला सुंदर नावाच्या धानाला ३ हजार ९११ रुपये प्रती क्विंटलच्या दराने खरेदी–विक्री केले. विशेष म्हणजे गत वर्षी याच शेतकऱ्याचे धान विक्री साठी सर्वप्रथम बाजार समितीत आला होता. या प्रसंगी बाजार समितीचे संचालक धनश्याम पारधी, मिलींद कुंभरे, रविंद्रकुमार वहिले, जयप्रकाश गौतम, शरद अग्रवाल, रामसागर धावडे, रमेश टेंभरे, अनिल भगत, ओमप्रकाश पटले, दुर्गाप्रसाद कोठे, डॉ. गोवर्धन चौहाण, मदनलाल पटले, सौ. प्रतिमा जैतवार, सौ. मनिषा पटले, श्रीमती ललिता नागरिकर, समितीचे प्रभारी चंद्रकांत चव्हाण व सर्व कर्मचारी, स्त्री हमाल आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वाधार योजनेंतर्गत अर्जातील त्रुटींची पुर्तता १० सप्टेंबरपुर्वी करण्याचे आवाहन

**गोंदिया :–** अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ११ वी, १२ वी व त्यानंतरचे व्यावसायीक तसेच बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले, सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज केलेले व शासकीय वसतीगृह प्रवेश प्रक्रियेनंतर वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना या पोर्टलवर ऑनलाईन सुरु करण्यात आलेली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२६ डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालुकास्तरापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

# संयुक्त राष्ट्रांकडून बालविवाहाविरुद्धच्या “जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन’ संचालित मोहिमेची दखल; ऐतिहासिक ‘जागतिक दिन’ केला जाहीर




**गोंदिया:–** जिल्ह्य बालविवाहाविरुद्ध जमीनी पातळीवर अभियान राबविणाऱ्या इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी, गोंदिया यांनी संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले आहे. संयुक्त राष्ट्रांनी २७ नोव्हेंबर हा दिवस “बालविवाह, अल्पवयीन विवाह आणि सक्तीच्या विवाहांच्या निर्मूलनाचा आंतरराष्ट्रीय दिन’ म्हणून घोषित केला आहे.

संयुक्त राष्ट्रांची ही घोषणा म्हणजे मजस्ट राईट्स फॉर चिल्ड्रनफ(जेआरसी) च्या अभूतपूर्व प्रयत्नांना मिळालेली जागतिक मान्यता असल्याचे संस्थेने म्हटले आहे. मजस्ट राईट्स फॉर चिल्ड्रनफ हे बालविवाहविरोधात देशभरात शासन आणि प्रशासनासोबत काम करणारे भारतातील सर्वात मोठे स्वयंसेवी संस्थांचे नेटवर्क आहे. इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी, ही संस्था जेआरसीची भागीदार असून, बालविवाहविरोधात एक विशेष आंतरराष्ट्रीय दिन घोषित केला जावा यासाठी जेआरसी अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्न करत होती.

शिक्षक दिनानिमित्त संस्कार हायस्कूल गोंदिया येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना, इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी चे संचालक अमित बेलेकर म्हणाले की, भारतामधून उठवलेला आवाज आज एक जागतिक संकल्प बनला आहे. आपल्या प्रयत्नांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे, हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. संयुक्त राष्ट्रांनी बालविवाह रोखण्यासाठी समर्पित जागतिक दिनासाठी २७ नोव्हेंबर या तारखेची निवड करणे ही देखील भारतासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. २०२४ मध्ये याच दिवशी भारत सरकारने जेआरसी च्या भागीदारांसोबत मिळून ‘बालविवाह मुक्त भारत’ मोहिमेची सुरुवात केली होती.

ज्ञानेश्वर पटले जिल्हा समन्वयक (बाल विवाह मुक्त भारत अभियान) आय एस डब्लु एस हे मनाले कि आता प्रत्येक मुलाला बालविवाहमुक्त बालपण मिळावे, हे सुनिश्चित करणे आपली जबाबदारी आहे. यांनी बालविवाहमुक्त भारतासाठी सरकार, प्रशासन, शिक्षक, धर्मगुरू आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले .

मजस्ट राइट्स फॉर चिल्ड्रनफ (JRC) चे संस्थापक भुवन रिभू यांनी बालविवाह रोखण्यासाठी एका विशेष दिवसाची घोषणा करण्याबाबत जागतिक स्तरावर आवाहन केले होते. मार्च २०२६ मध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये (UN) भाषण करताना, रिभू यांनी या प्रस्तावाचा पुनरुच्चार केला. भारतासह ६७ देशांच्या पाठिंब्याने संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत (UNGA) एक ठराव मांडला; या ठरावाद्वारे २७ नोव्हेंबर हा दिवस बालविवाह निर्मूलनासाठी समर्पित जागतिक दिवस म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव होता. अखेरीस, ४ सप्टेंबर रोजी संयुक्त राष्ट्रांनी हा ठराव मंजूर केला. याप्रसंगी उपस्थित ४० शिक्षकांचे भेटवस्तू व सम्मानपत्र देऊन गौरव करण्यात आले.

यावेळी संस्कार हायस्कूल चे सचिव मधु बन्सोड, संचालक सतीश बन्सोड, जयश्री फुले प्राचार्य व शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुर्णप्रकाश कुथेकर, दीपमाला भालेराव, भाग्यश्री ठाकरे, अमोल पानतावणे, पूजा अनकर, आचल फुलेकर, शीतल राऊत, अपूर्व फुले, राजकुमार वैद्य, यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिक्षक म्हणजे राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार–खा. राजेंद्र जैन

## तिरोडा येथे शिक्षक दिनानिमित्त सेवानिवृत्त शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा थाटात सत्कार



**तिरोडा :** –शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देत नाही, तर त्यांच्या विचारक्षमतेला आणि व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडून भविष्याला आकार देण्याचे पवित्र कार्य करतो. सक्षम, सुजाण आणि जबाबदार नागरिक घडवून समृद्ध राष्ट्राची पायाभरणी करणाऱ्या शिक्षकांची भूमिका राष्ट्रनिर्मितीत अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन खासदार राजेंद्र जैन यांनी केले.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त (शिक्षक दिन) तिरोडा येथे तिरोडा–गोरेगाव मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले यांच्यावतीने आयोजित सेवानिवृत्त शिक्षक, आदर्श शिक्षक तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून खा. राजेंद्र जैन बोलत होते.

कार्यक्रमाला खासदार राजेंद्र जैन, आमदार परिणय फुके, आमदार विजय रहांगडाले, आमदार अविनाश ब्राह्मणकर आणि जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. उपस्थितांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला अभिवादन करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.आपल्या मनोगतात खा. जैन पुढे म्हणाले की, ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षकांचा त्याग आणि समर्पणाचा गौरव करण्याचा दिवस आहे. योग्य मार्गदर्शनातूनच सशक्त समाज आणि समृद्ध राष्ट्र साकार होत असते, त्यामुळे शिक्षकांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

या सोहळ्याला माजी आमदार हेमंत पटले, माजी आमदार खोमेश रहांगडाले, माजी आमदार भजनदास वैद्य, प्रेमकुमार रहांगडाले, सीताताई रहांगडाले, राजलक्ष्मी तुरकर, अशोक असाटी, राजेश गुनेरिया, अविनाश जायस्वाल, दुर्गाप्रसाद ठाकरे, अश्विनी पटले, रवी पटले, शंकरलाल टेंभरे, तुमेश्वरी बघेले, ममता बैस, छाया कटरे, कुमुद मेश्राम, कादर अन्सारी, लता पुडके, रश्मी बुराडे, राखी गुनेरिया, माया बरयेकर यांच्यासह परिसरातील नागरिक, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता नक्षलग्रस्त भागातील सवलतींचा आढावा,राज्य शासनाकडून समिती गठित

**गोंदिया:–** महाराष्ट्रातून नक्षलवादाचे उच्चाटन झाल्याने जंगलबहुल भागातील चित्र झपाट्याने बदलत आहे. सोयीसुविधा पुरविल्या जात असतानाच आता अधिकारी कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त भागासाठी लागू असलेल्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने आठ सदस्यीय समिती गठित केली आहे. गोंदिया जिल्ह्यात नक्षल्यांचा प्रवक्ता अनंतच्या टीमचे वास्तव्य होते. वर्षभरापूर्वी अनंतने आपल्या सहकाऱ्यांसह सरकारपुढे शरणागती पत्करल्याने या जिल्ह्यातून सशस्त्र नक्षलवाद संपुष्टात आला.



सामान्य प्रशासन विभागाने १८ ऑगस्ट रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार समितीच्या अध्यक्षपदी नागपूरच्या विभागीय आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर नाशिक, कोकण आणि अमरावती विभागीय आयुक्त, विशेष पोलिस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान), नागपूर, अपर आयुक्त (आदिवासी विकास), नागपूर, सहसंचालक (लेखा व कोषागारे), नागपूर विभाग तसेच उपायुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

उपायुक्त (महसूल) हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहे. शासन निर्णयानुसार, आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत अधिकारी–कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलती व सुविधांचा सविस्तर आढावा घेऊन शासनाला योग्य त्या शिफारसी करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी आहे. यासाठी यापूर्वीच्या शासन निर्णयांमध्ये नमूद करण्यात आलेल्या सवलती व सुविधांचाही विचार करण्यात येणार आहे. समितीने अचार

आपल्या कार्यकक्षेनुसार सवलती व सुविधांचा अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करावा, असे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे दुर्गम, आदिवासी तसेच नक्षलग्रस्त भागात सेवा बजावणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सवलतींच्या सद्यःस्थितीचा आढावा घेऊन त्यामध्ये आवश्यक बदल अथवा सुधारणा सुचविल्या जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, समितीच्या शिफारसींमुळे दुर्गम व आव्हानात्मक परिस्थितीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या प्रोत्साहनपर सुविधा आणखी प्रभावी होणार का, याकडे संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कोचिंग क्लासेसच्या मनमानीवर कडक लगाम

## महाराष्ट्र खाजगी कोचिंग केंद्र अधिनियम २०२६ चा नवीन मसुदा प्रस्तावित : कोचिंग सेंटर संचालकांमध्ये नाराजी

**गोंदिया:–** खाजगी कोचिंग क्लासेसच्या मनमानीवर अंकुश ठेवण्यासाठी राज्य सरकारने ममहाराष्ट्र खाजगी कोचिंग केंद्र अधिनियम २०२६फ चा मसुदा तयार केला आहे. यात १३ वर्षांखालील विद्यार्थ्यांना प्रवेशबंदी, रोज जास्तीत जास्त ५ तासांची मर्यादा, आठवड्यातून १ दिवस सुट्टी आणि २५ पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या सेंटर्सची नोंदणी बंधनकारक केली आहे. नियम मोडल्यास दंड व नोंदणी रद्दची तरतूद आहे. त्यामुळे कोचिंग सेंटर संचालकाचे धाबे दणाणले आहेत. या नियमांविरोधात कोचिंग क्लासेस सेंटरमध्ये अस्वस्थता पसरली असून नाराजी व्यक्त केली जात आहे.



शासनाने खाजगी कोचिंग क्लासेसच्या मनमानीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र खाजगी कोचिंग केंद्र नोंदणी आणि नियमन अधिनियम २०२६ चा मसुदा प्रस्तावित केला आहे. खाजगी कोचिंग क्लासेसवर सरकारचा लगाम लागणार आहे. या मसुद्यानुसार विद्यार्थ्यांचे वर्ग दिवसाला जास्तीत जास्त पाच तास घेता येणार आहेत. पहाटे तसेच रात्री उशीरा वर्ग घेण्यावर निर्बंध असतील. तसेच आठवड्यातून एक दिवस सुट्टी द्यावी लागणार आहे. १३ वर्षाखालील मुलांना क्लासेसमध्ये प्रवेश देता येणार आहे. २५ पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या सेंटरची नोंदणी बंधनकारक असेल. शिक्षक किमान पदवीधर असावा, क्लासेसला शुल्क, अभ्यासक्रम, शिक्षक, वेळापत्रक आणि रिफंड पॉलिसी जाहीर करावी लागेल. शुल्काची अधिकृत पावती द्यावी लागेल. विद्यार्थ्यांना मध्येच शिकवणी सोडल्यास दहा दिवसात शुल्क परत करावे लागेल. नियम मोडल्यास ५० लाखांपर्यंत दंड, किरकोळ उल्लंघन केल्यास १ ते ५ लाख, वारंवार उल्लंघन केल्यास १० लाख, गंभीर उल्लंघन १० ते ५० लाख तसेच नोंदणी रद्द करून शिकवणी बंद करण्याची कारवाई होऊ शकते. सध्या हा मसुदा प्रस्तावित आहे. सूचना व हरकती नंतर सरकारकडून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. पावत्यांची मर्यादा, प्रवेशावर निर्बंध आणि लाखांचा दंड या नियमांमुळे कोचिंग क्लासेसच्या पद्धतीत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. असे असले तरी शासनाच्या या भुमिकेमुळे कोचिंग सेंटर संचालकांमध्ये धास्तीपूर्ण नाराजी दिसून येत आहे.

### शासनाच्या मसुद्यातील प्रमुख प्रस्तावित नियम

**१३ वर्षांखालील मुलांना बंदीः १३ वर्षांखालील लहान मुलांना खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश देण्यास पूर्णपणे बंदी असेल, २५ पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या सर्व कोचिंग सेंटर्सना शासनाकडे अधिकृत नोंदणी करावी लागेल, क्लासेसमधील शिक्षक किमान पदवीधर असणे अनिवार्य असेल. क्लासेसचे शुल्क, अभ्यासक्रम, शिक्षकांची माहिती, वेळापत्रक व मरिफंड पॉलिसीफस्पष्ट जाहीर करावी लागेल. शुल्काची अधिकृत पावती देणे बंधनकारक असेल, विद्यार्थ्यांनी मध्येच वर्ग सोडल्यास १० दिवसांच्या आत शुल्क परत करावे लागेल. गुणवंत विद्यार्थ्यांची रँक किंवा १०० टक्के निकालाची खोटी हमी देणाऱ्या जाहिरातींवर बंदी असेल.**

# हमीभाव व बोनसच्या मागणीसाठी २९ सप्टेंबरला रस्ता रोको

## भारतीय किसान संघ व अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघाचा निर्धार

**अर्जुनी मोरगांव:–**धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा आणि धानाला ३,५०० रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा, या मुख्य मागण्यांसाठी भारतीय किसान संघ व अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघाच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी मुंबई–कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील कोहमारा (वडसा–गोंदिया टी–पॉइंट) येथे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



या आंदोलनाच्या नियोजनासाठी शुक्रवारी (४ सप्टेंबर) शासकीय विश्रामगृह साकोली येथे भारतीय किसान संघ विदर्भ प्रांताची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा, छत्तीसगड

राज्याच्या धर्तीवर धानाला प्रतिक्विंटल ३,५०० रुपये दर द्यावा, धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून ४८ तासांच्या आत शेतमालाचे चुकारे देण्यात यावेत, रोहित्र व विहिरींवर शेतकऱ्यांना तात्काळ नवीन कृषी विद्युत कनेक्शन देणे सुरू करावे आदि मागण्या शासनाला करण्यात आले.

आंदोलनापूर्वी भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या चारही जिल्ह्यांतील सर्व आमदार व खासदारांना निवेदन दिले जाणार आहे. लोकप्रतिनिधींनी तात्काळ मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून बोनसबाबत सकारात्मक निर्णय घडवून आणावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन पत्राद्वारे केले जाणार आहे. कोहमारा येथील या रस्ता रोको आंदोलनात पूर्व विदर्भातील चारही जिल्ह्यांतील शेतकरी ट्रॅक्टर मोर्चासह संख्येने सहभागी होणार असल्याचे भारतीय किसान संघाच्या वतीने सांगण्यात आले.

# शासकीय वसतिगृह प्रवेशाकरीता १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**गोंदिया :–** शैक्षणिक सत्र २०२६–२७ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला–मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रीया सुरु झालेली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला–मुलींच्या वसतिगृहामध्ये १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज भरण्यात यावा. मेरीट लिस्ट प्रमाणे वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा लाभ मिळाला नाही, त्या विद्यार्थ्यांचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

शासनाच्या htt{s: //hmasnew.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह प्रवेशाकरीता दि.१५ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृह अथवा इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात विहीत मुदतीत सादर करावी.

गोंदिया जिल्ह्यातील इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, दिव्यांग, अनाथ व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) या विद्यार्थ्यांनी वसतिगृह तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीकरीता ओबीसी मुला–मुलींचे वसतिगृह, गोंदिया येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, गोंदिया या कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक सविता किर्तीकर यांनी केले आहे.

# समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचे तीन महिन्याचे मानधन रखडले

**गोंदिया:–** समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील तीन महिन्यांपासून मानधन प्रलंबित असल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. मानधनाची प्रक्रिया नवीन एसएनए स्पर्श प्रणालीमध्ये अडकून पडल्याने राज्यातील हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यात गोंदिया जिल्ह्यातील ७८ कंत्राटी कर्मचाऱ्यांचाही समावेश असून, मानधन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक नियोजन पार कोलमडले आहे.



**समग्र शिक्षा अभियानाच्या शिक्षण**

विभागांतर्गत सहायक कार्यक्रमअधिकारी, प्रोग्रामर, डेटा एंटी ऑपरेटर, जिल्हा समन्वयक, विषय साधनव्यक्ती, वरिष्ठ सहायक लेखा, कनिष्ठ अभियंता यांसारख्या विविध पदांवर हे कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. शैक्षणिक कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावूनही वेळेवर मानधन मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला मध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

मागील तीन महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने घरभाडे, मुलांची शाळा कॉलेजची फी, औषधोपचार, कर्जाचे हप्ते आणि दैनंदिन घरखर्च भागवणे कठीण झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांना आता उसनवारी व कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन तातडीने अदा करावे व मानधनाची प्रक्रिया पूर्ववत सुरळीत करावी, अशी मागणी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

**एसएनए स्पर्श प्रणालीवर कर्मचाऱ्यांची नाराजी**

मानधन वितरणासाठी सुरू करण्यात आलेल्या स्पर्श प्रणालीतील तांत्रिक व प्रशासकीय गुंतागुंतीमुळे मानधनाला विलंब होत आहे. या प्रणालीत ७५ टक्के, १३ टक्के आणि १२ टक्के अशा तीन टप्प्यांत मानधन वितरित केले जात असल्याने सर्व कर्मचाऱ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. यापूर्वीची पीएफएमएस प्रणालीच अधिक सुलभ व योग्य होती, अशी भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## सरपंच पदाचे आरक्षण जाहीरः २७४ ग्राम पंचायतींवर महिला राज

**गोंदिया :–** जिल्ह्यातील ५४५ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. सन २०२५ ते २०३० या पाच वर्षाच्या कालावधीसाठी सरपंच पदांच्या आरक्षणाची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी ममुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार तसेच ग्राम विकास विभागाच्या १८ ऑगस्ट २०२६ च्या परीपत्रकानुसार जिल्ह्यातील एकूण ५४५ ग्रामपंचायतींपैकी २७४ पदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत. एकंदरीत आरक्षण जाहिर झाल्याने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे.

जिल्ह्यातील एकूण ५४५ ग्रामपंचायतींपैकी २७४ पदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि खुला प्रवर्ग या सर्वच स्तरांवर ५० टक्के महिला आरक्षणाचा नियम पाळण्यात आला आहे.

# खांबी-सिरेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तात्काळ सुरू करा; जि.प. सदस्य रचनाताई गहाणे यांचे अध्यक्षांना निवेदन

**अर्जुनी मोरगाव:–**अर्जुनी–मोर तालुक्यातील खांबी व सिरेगाव बांध येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या सप्टेंबर महिन्यापासून बंद पडल्याने तब्बल ३० गावांतील नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. ही योजना तातडीने सुरू करून नागरिकांना नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी जिल्हा परिषद सदस्य रचनाताई गहाणे यांनी गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

३० गावांत पाण्याची तीव्र टंचाई

या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अर्जुनी–मोर तालुक्यातील ३० महत्त्वाच्या गावांचा समावेश आहे. मात्र, मागील काही महिन्यांपासून ही योजना ठप्प असल्यामुळे हजारो ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती करावी लागत आहे. दैनंदिन जीवनावर याचा विपरीत परिणाम झाला असून, संतप्त नागरिक आता लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त करत आहेत.

पाणी हा मूलभूत हक्क असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. हा प्रश्न प्रशासनाने तातडीने सोडवला नाही, तर ३० गावांतील नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा रचनाताई गहाणे यांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिला.

# प्राचार्य व मुख्याध्यापकांचा खा.जैन यांच्या हस्ते सत्कार



**गोंदिया :–** सामाजिक न्याय विभाग आणि प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० कोटी व्यसनमुक्त भारत प्रतिज्ञा महाअभियान अंतर्गत, गोंदिया ब्रह्मा कुमारी सेवा केंद्र आणि सहा उप–सेवा केंद्रांनी जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांना भेट देऊन सुमारे ६५ हजार सहभागींना व्यसनमुक्तीची शपथ दिली. शिक्षक दिनानिमित्त न्यूलक्ष्मी नगर येथील ब्रह्मा कुमारी स्वदर्शन भवनात आयोजित समारंभात खासदार राजेंद्र जैन आणि आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते, या मोहिमेत सहभागी ७० शाळा व महाविद्यालयांच्या प्राचार्य आणि मुख्याध्यापकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यात्प्रसंगी खासदार राजेंद्र जैन यांनी, व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांची भूमिका महत्त्वाची आहे आणि त्यांनी सर्व लोकांना व्यसनमुक्ती मोहीम अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गोंदियाच्या प्रादेशिक संचालक राजयोगिनी रत्नमाला दीदी यांनी भूषवले.

या कार्यक्रमात गजेंद्र फुंडे, विजय बाहेकर, अनिल देशमुख, लखन सिंग कात्रे, दुलीचंद बुद्धे, केतन तुरकर यांच्यासह ब्रह्मकुमारी सेवा केंद्राचे अधिकारी, शिक्षक आणि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले आणि बी. के. विनोद भाई हरिनखेडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## मोहाडी ते इंदिरानगर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

**गोरेगाव:–** तालुक्यातील मोहाडी ते इंदिरानगर या अत्यंत महत्त्वाच्या मुख्य मार्गावर जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक आणि वाहनचालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नवीन रस्त्याचे बांधकाम तात्काळ सुरू करावे, या मागणीसाठी गोंदिया जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) गाठत आक्रमक भूमिका घेतली.या संदर्भात डॉ. लक्ष्मण भगत यांनी गोंदिया सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली व त्यांना मागण्यांचे निवेदन सोपवले.

मोहाडी ते इंदिरानगर हा मार्ग सततच्या वाहतुकीमुळे आणि खड्ड्यांमुळे अत्यंत धोकादायक बनला आहे. यामुळे लहान–मोठे अपघात रोजचेच झाले असून नागरिकांचा प्रवास अत्यंत कठीण झाला आहे. ही बिकट परिस्थिती लक्षात घेता, प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता रस्त्याचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी आग्रही मागणी सभापतींनी केली.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या दुरुस्तीबाबत व नवीन बांधकामाबाबत सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

# गोंदियात प्रथमच आढळला दुर्मीळ युरोपियन रोलर पक्षी; मुरदोली जंगलात वनरक्षकांनी केली नोंद

**गोंदिया :–** जिल्ह्याच्या समृद्ध जैवविविधतेत आणखी एका दुर्मीळ स्थलांतरित पक्ष्याची नोंद झाली आहे. युरोपियन रोलर हा पक्षी गोंदिया जिल्ह्यात प्रथमच आढळून आला असून, गोरेगाव तालुक्यातील मुरदोली जंगल परिसरात या पक्ष्याचं दर्शन झाले. वनरक्षक आरती फुले यांनी पक्षीनिरीक्षण करताना या दुर्मीळ पक्ष्याची नोंद केली. गोंदिया जिल्ह्यात पहिल्यांदाच युरोपियन रोलरची नोंद झाल्याने पक्षीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रातही हा पक्षी अत्यंत कमी प्रमाणात आढळतो. युरोपियन रोलर हा स्थलांतरित पक्षी असून, स्थलांतराच्या काळात तो महाराष्ट्रातील काही भागात दिसून येतो. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील आतापर्यंतच्या उपलब्ध नोंदींमध्ये नागपूर, वर्धा, सोलापूर आणि यवतमाळ या भागात या पक्ष्याची नोंद झाल्याचे आढळते. त्यामुळे गोंदियातील ही नोंद पक्षीवैविध्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.



गोंदिया जिल्हा म्हणजे घनदाट जंगल, तलाव, जलस्रोत आणि विविध प्रकारच्या वन्यजीवांनी समृद्ध असलेला परिसर. याच गोंदियाच्या जैवविविधतेमध्ये आता एका दुर्मीळ स्थलांतरित पक्ष्याची भर पडली आहे.

महाराष्ट्रातील उपलब्ध पक्षीनिरीक्षण नोंदी पाहिल्यास युरोपियन रोलरचे दर्शन काही मोजक्या ठिकाणी झाल्याचे दिसून येते. नागपूरच्या अंबाझरी तलाव परिसरात ५ जून २००५ रोजी युरोपियन रोलरची नोंद करण्यात आली. त्यानंतर नागपूरमधील देगमा जंगल परिसर, हिंगणा रोड येथे २०१४ आणि २०१५ मध्ये या स्थलांतरित पक्ष्याच्या नोंदी झाल्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील पिंपळखुटा, छक–६४७ परिसरात ६ ऑक्टोबर २०२३ रोजी या पक्ष्याची ईबर्ड वर नोंद करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील नन्नज बस्टर्ड वाइल्डलाइफ सँक्च्युरी परिसरात जुन्या पक्षी नोंदींमध्ये युरोपियन रोलरचा उल्लेख आढळतो. तर यवतमाळ परिसरातील पक्षी यादीतही युरोपियन रोलरची नोंद असल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर आता गोंदिया जिल्ह्यातील जंगलात झालेली नोंद विशेष महत्त्वाची ठरत आहे.

# सरपंच पतीचा वाढता हस्तक्षेप ग्रामस्थांच्या रोषाचे कारण



**गोंदिया:–** पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सहेसपूर येथील ग्रामपंचायतीमध्ये महिला राजवटीला छेद देत सरपंचपतीचा वाढता हस्तक्षेप आता ग्रामस्थांच्या तीव्र असंतोषाचे कारण ठरत आहे. मासिक सभा व ग्रामसभेत लोकप्रतिनिधींऐवजी सरपंचपती हितेश पताहे यांचाच हस्तक्षेप होत असल्याने ग्रामस्थांनी संतप्त आक्रमक भूमिका घेतली आहे.

सन २०२२ च्या निवडणुकांमध्ये महिला राखीव पदावरून संगीता हितेश पताहे या सरपंच म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात कारभार त्यांचा पती हितेश पताहे चालवित असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. २७ ऑगस्ट रोजी आयोजित ग्रामसभेत ४०० हून अधिक महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते. तर २१४ जणांनी स्वाक्षरी नोंदवली होती. या सभेत ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच, ५ महिला सदस्य, उपसरपंच व ३ पुरुष सदस्य असे प्रतिनिधी असतानाही, प्रत्यक्ष कारभारात सरपंचपतीचाच वरचष्मा पाहायला मिळत असतो. यावेळी ग्रामस्थांनी सरपंच झाल्यापासून ते सन २०२५–२०२६ मध्ये प्राप्त झालेला निधी आणि ग्राम पंचायतीच्या कामांच्या वाटपाबाबत विविध प्रश्नांची सरबत्ती करीत प्रशासनाला व सरपंचांना धारेवर धरले. ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीला ग्रामसभेपूर्वी रीतसर माहिती मागविण्याच्या उद्देशाने ग्रामसभा आयोजित असल्याच्या तीन दिवसांपूर्वी अर्ज दिला असल्याचे सांगितले जाते. याच कारणावरून ग्रामसभा ही रंगण्याचा अंदाज पाहून सरपंचाने पोलिस बंदोबस्त करून ठेवला. त्यात हवालदारासह ५ पोलिस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेत ग्राम सभा पार पडली. मात्र ४०० च्या वर उपस्थिती असणाऱ्या सभेत एकही महिला पोलिस कॉन्स्टेबल उपस्थित नव्हती.

## ग्रामसभेतून काढता पाय

**ग्रामस्थांनी अनेक प्रश्नांची झोड उठवली. त्यात पोर्टलवर अनेक कामे झाल्याचे दाखवून निधीची उचल केली असल्याचे दिसून येत आहे, गावात इलेक्ट्रिक खांबावर पथदिवे लावणे, रस्ते बांधकाम, तलाव पुनर्भरण व खोलीकरण अशा लोकांचे प्रश्न वाऱ्यावर सोडून, प्रश्नांची उत्तरे देण्याच्या आधीच सभा रद्द करून सरपंचांनी सभेतून काढता पाय घेतल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.**

**महाराष्ट्रभर ग्रामसेवक संघटनेच्या माध्यमातून १५ ऑगस्टनंतर होणाऱ्या सर्व ग्रामसभांवर ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी बहिष्कार टाकला आहे. सरपंचाच्या उपस्थितीत ग्रामसभा आयोजित करण्यात आली. परंतु २७ ऑगस्टच्या आयोजित ग्रामसभेत ग्रामपंचायतीचे सचिव उपस्थित नसल्याने ग्रामस्थांच्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. यानंतर या सर्व प्रश्नांची उत्तरे होणाऱ्या अर्धवार्षिक ग्रामसभेत देण्यात येतील. गावकऱ्यांनी केलेले आरोप तथ्यहीन आहेत.**

**– संगीता हितेश पताहे, सरपंच, सहेसपूर.**

## मुंडीपारसह इतर केंद्रांतील रिक्त पदे त्वरित भरण्याची सशेंद्र भगत यांची मागणी

**गोरेगाव:–**तालुक्यातील मुंडीपार जिल्हा परिषद क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणावर रिक्त जागांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधत, नुकत्याच ङ्गपवित्र पोर्टलफद्वारे जिल्ह्याला मिळालेल्या ४५० शिक्षकांमधून मुंडीपार क्षेत्रातील शाळांमध्ये प्राधान्याने नियुक्ती करावी, अशी आक्रमक मागणी जिल्हा परिषद सदस्य सशेंद्र भगत यांनी केली आहे.

तालुक्यातील विविध केंद्रांमध्ये शिक्षकांची पदसंख्या अपुरी असल्याने शिक्षण व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. यामध्ये मुंडीपार केंद्रांतर्गत १५, तिल्ली मोहगाव केंद्रांतर्गत १६, कुहाडी केंद्रात १३, दवडीपार केंद्रात ८ तर चोपा केंद्रात तब्बल १८ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. शाळांमध्ये शिक्षकच नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले असून पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

# रेलटोली परिसरातील ऑडिटोरियमच्या कामाला मिळणार गती

**गोंदिया :–** गोंदिया शहराच्या प्रभाग क्रमांक २ मधील रेलटोली परिसरात गेल्या १३ वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत पडलेल्या भव्य ऑडिटोरियमच्या कामाला आता लवकरच गती मिळणार आहे. आज गोंदिया दौऱ्यावर असताना पालकमंत्री इंद्रनील नाईक आणि माननीय खासदार राजेंद्र जैन यांनी या अपूर्ण ऑडिटोरियमच्या जागेला प्रत्यक्ष भेट देऊन कामाची पाहणी केली. केवळ कागदावर राहिलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्ष जमिनीवर उतरवून लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर ठोस पावले उचलण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



या पाहणीदरम्यान दोन्ही नेत्यांनी बांधकामाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. वर्षानुवर्षे रखडलेल्या या कामाबद्दल गांभीर्य व्यक्त करत, हे काम वेळेत आणिदर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी जबाबदारी निश्चित करून त्वरित आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. गोंदिया शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांसाठी हे ऑडिटोरियम अत्यंत महत्त्वाचे साधन ठरणार असल्याने, या निर्णयामुळे गोंदियाकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी केतन तुरकर, संजीव राय, अनूज जायसवाल, अरविंद चौरसिया, ज्वाली पटेल, पीनल पटेल, अमित गुप्ता, प्रशांत मिश्रा, रोहित करोट, संजीव गुप्ता, सुमित गुप्ता, अंकित यादव, लक्ष्मी पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकप्रतिनिधींच्या या पुढाकारामुळे आता प्रशासकीय हालचालींना वेग येईल आणि हे भव्य ऑडिटोरियम लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होईल, अशी भक्कम आशा निर्माण झाली आहे.